प/५६९

# करारनामा

## विद्युत विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**विद्युत विभाग:- पीएमपीएमएल/विद्युत विभाग/५९१** **दि.१२/०५/२०२३**
**वर्कऑर्डर क्र.५९१ दि. १२/०५/२०२३. (स्विकृती दि.१८/०५/२०२३)**

**कामाचे नांव:-** परिवहन महामंडळाचे विविध डेपो, कॉलनी, इमारती, मुख्य कार्यालय इमारत इ. ठिकाणी नवीन ऐसी बसविणेबाबत.

**ठेकेदाराचे नांव :- मे. श्री अथर्वरथी इलेक्ट्रिकल, पुणे**

**पत्ता:-** स.नं.११/१,पाटील चाळ,
धनकवडी, पुणे-४११०४३

**कामाची मुदत :-** दि. १८/०५/२०२३ ते दि. १७/०५/२०२४

**निविदा रक्कम रू:-** ५,००,०००/- (१४.११% कमी)

**अनामत रक्कम रू:-** २५,०००/-

**करारनामा फी :-** ५००/-

**मसूदा फी:-** २,५००/-

Scanned with CamScanner

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ BY 239335

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

07 JUN 2023

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

20 JUN 2023

| | |
|---|---|
| विक्री नोंदवही क्र 3498 | दि. |
| दस्ताचा प्रकार/अनुच्छेद क्रमांक | :- करार |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव | :- |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचा पत्ता | :- |
| दुसऱ्या पक्षकाराचे नांव | :- |
| हस्ते असल्यास नांव व पत्ता | :- |
| मुद्रांक शुल्क रक्कम | :- 500 |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही | :- |

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही/पत्ता/
परवाना क्रमांक

सौ. पल्लवी नि. कादबाने
परवाना क्र. २२०११०२
स.नं. २/१५, जीवनधारानगर, धनकवडी
मोबा. ९८५०९१२१८१

# करारनामा

आज दिनांक माहे जुन सन २०२३ इसवी ते दिवशी करारनामा करुन देतो ऐसाजे......

**(करारनामा लिहून देणार)**
**मे. श्री अथर्वरथी इलेक्ट्रिकल, पुणे तर्फे प्रोप्रायटर**
**श्री.संजय प्रभाकर गरूड, वय वर्ष:-४८, धंदा:- कॉन्ट्रक्टर,**
**स.नं.११/१,पाटील चाळ, धनकवडी, पुणे-४११०४३.**

Scanned with CamScanner

फ/५८३

या नावाने भारतात ठेकेदारची व्यवसाय करणारी फर्म तीचे वतीने व त्यांचे वालीवारस, निष्पादक, अभिहस्तांकीती या पुढे ज्यांचा उल्लेख ठेकेदार (कॉन्ट्रॅक्टर) असा केलेला आहे.

आणि

**(करारनामा लिहून घेणार)**
**मा.श्रीमती.प्रज्ञा पोतदार,**
**सहव्यवस्थापकीय संचालक,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**
**स्वारगेट, पुणे-४११०३७**

यापुढे ज्यांचा सहव्यवस्थापकीय संचालक असा उल्लेख केला आहे. यामध्ये कायद्यामध्ये विहित असलेल्या संदर्भात विश्लेषणाविरुद्ध नसलेले असे त्यांचे वारस, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. म्हणून त्या त्या वेळी पदधारण करणारी व्यक्ती यांचा समावेश आहे. यापुढे त्यांचा उल्लेख पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. असा केलेला आहे.

कंपनी ॲक्ट अन्वये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जाहिरात क्र.ELE-03 दि.०७/०४/२०२३ रोजी दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे या दैनिकात जाहिरात देउन (कामाचे नांव ) **परिवहन महामंडळाचे विविध डेपो, कॉलनी, इमारती, मुख्य कार्यालय इमारत इ. ठिकाणी नवीन ऐसी बसविणेबाबत.**

**विषयांकित कामाची मुदत दिनांक १८/०५/२०२३ ते दिनांक १७/०५/२०२४ इतकी आहे.**

नमुन्यातील निविदा मागविण्यात आली होती. उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन मे. श्री अथर्वरथी इलेक्ट्रिकल, पुणे यांना याकामी निविदेतील शेड्युल बी मधील परिणाम, दर, तपशील, निविदेतील अटी व शर्ती इ. माहितीप्रमाणे आपली निविदा परिवहन महामंडळास सादर केली आहे. ठेकेदाराने भरलेली रक्कम रुपये ४,२५,०५०/- ची निविदा यथास्थितीत पी.एम.पी.एम.एल./विद्युत विभाग/५११ दि.१२/०५/२०२३ ने मा.सहव्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी मान्य करुन स्विकारली आहे. सदर मान्य निविदेतील अटी व शर्ती यांना अधिन राहून ठेकेदार जाहीर करीत आहे व स्वखुषीने लिहून देत आहे की,

१. उपरोक्त काम विश्वासार्हतेने पार पाडण्यासाठी कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम विहित मुदतीत पुर्ण करण्याचे जबाबदारीपोटी अनामत रक्कम म्हणून (सिक्युरिटी डिपॉझिट) जाहिरातीत दर्शविलेल्या निविदा रक्कम रु. ५,००,०००/- च्या ५ टक्के रक्कम रुपये २५,०००/- महामंडळाच्या नावे असणारी मुदत ठेवची पावती खात्यास सादर करावी. सदर मुदत ठेव वेळेत सादर न केल्यास उर्वरित अनामत रक्कम रुपये २५,०००/- आपले बिलामधून वसूल करण्यांत येईल. तसेच १ टक्के बयाणा रक्कम रु. ७,५००/- ऑनलाईन पावती क्र.CPACQTEEQ5 दि. १२/०४/२०२३ परिवहन महामंडळाकडील टेंडर सेल विभागाकडे जमा केलेली आहे.

२. निविदेसोबत जोडलेली सविस्तर निविदा सुचना पुरवणी निविदा सुचना निविदा फॉर्म प्राईस व्हेरीएशन क्लॉज शेड्युल ब व विशेष अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या सयंत्राच्या विशिष्ट तपशील, जनरल स्पेसिफिकेशन व विशेष अटी ठेकेदारचे हमीपत्र व डिक्लेरेशन, वर्कऑर्डर, कामाचे ड्रॉईंग्ज इ. या करारनाम्याचे अविभाज्य भाग आहेत. (पार्ट ऑफ

Scanned with CamScanner

धिस ॲग्रीमेंट) या भागात नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तीचे अधिन राहून तसेच महामंडळाच्या मा. सहव्यवस्थापकीय संचालक व मा. सहाय्यक विद्युत अभियंता यांनी ठरवून दिलेल्या पध्दती व स्पेसिफिकेशनप्रमाणे कामाचे वाढीव अथवा कमी केलेले परिमाण, दुरूस्ती अथवा बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम ठेकेदार यांना कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम ठेकेदार यांनी कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून १ वर्ष (३६५ दिवस) मुदतीत म्हणजेच दि.१७/०५/२०२३ पर्यंत समाधानकारक पुर्ण करणेचे मान्य व स्विकृत केलेले आहे.

३. ठेकेदार व पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्यातील या करारान्वये व निविदेतील अटी व शर्तीनुसार ठेकेदार यांनी केलेल्या कामापोटी वेळोवेळी द्यावयाची बिले काम गुणवत्तेनुसार व समाधानकारक झालेनंतर महामंडळाने त्वरेने अदा करावयाचे ठरले आहे.

४. विनिर्देशित काम पुर्ण झालेल्या दिनांकापासून १२ कॅलेंडर महिन्यापर्यंतचा कालावधी डिफेक्ट लायबिलीटी पिरियड म्हणून धरला जाईल. या १२ महिन्यांच्या कालावधीत ठेकेदारने केलेल्या कामात दोष अथवा उणिवा आढळून आल्यास ठेकेदारने त्या स्वखर्चाने निविदा, अटी व शर्तीप्रमाणे दुरुस्त करुन या कालावधीत सदर निविदेतील काम सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील असे ठेकेदार यांनी मान्य, कबूल व स्विकृत केलेले आहे. ठेकेदारास महामंडळ अशा दुरुस्त्या अथवा बदलापोटी कोणतीही रक्कम अदा करणार नाही. ठेकेदाराकडून या जबाबदारीपोटी अनामत म्हणून निविदा रक्कमेच्या ५ टक्के रक्कम रुपये २५,०००/- अनामत रक्कम म्हणून कापून घेण्यात येईल व काम पूर्ण झालेपासून १२ कॅलेंडर महिने परिवहन महामंडळाकडे निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे राखून ठेवण्यात येईल. देखभाल हमी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल. दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्यास प्रतिदिन रक्कम रू. १००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. ठेकेदारने निविदेतील कामाचा विमा उतरविणे आवश्यक असून, तो विमा सदरील ठेकेदाराने ६० दिवसाचे आत रिसीट सादर करावी तसेच विमा कालावधीमध्ये विमा कंपनीकडे नुकसान भरपाई क्लेम करण्याची जबाबदारी ठेकेदार यांचेवर राहिल. डिफेक्ट लायबिलिटी पिरियड अस्तित्वात राहील व त्याबाबतचा पुरावा म्हणून प्रिमियम रिसीटी सादर केल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करणार नाही. असे ठेकेदार यांनी मान्य कबूल व स्विकृत केलेले आहे.

६. सदर करारनाम्यातील अटी शर्तीस अनुसरून कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास कोणताही वाद हा मे. जिल्हा न्यायालय, पुणे यांचे कार्यक्षेत्रामध्ये राहील.

सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

ठेकेदारांची स्वाक्षरी

साक्षः
१)

सहाय्यक विद्युत अभियंता
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.